CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com

। शुक्रवार, दि. १३ सप्टेंबर २०२४ । ▶ वर्ष : २२ वे ▶ अंक : ३४५ वा ▶ किंमत : ५ रुपये ▶ पाने ८




## हत्तुर ब्रिजवर दोन दुचाकींचा अपघात

**सोलापूर** : विजापूर रोडवरील हत्तुर ब्रिज जवळ दोन दुचाकिंची समोरासमोर धडक झाल्याने एका दुचाकिचा चालक ठार तर दोन्ही वाहनावरील दोघे जखमी झाले. हा अपघात बुधवारी सायंकाळच्या सुमारास घडला. समर्थ दिलीप धरणे (वय २२ रा .बाळे उत्तर सोलापूर) असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे. बुधवारी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास तो विकास सिद्धाराम पडसलगी (वय २२ रा.बाळे) यास दुचाकि पाठीमागे बसवून मंद्रूप ते सोलापूरच्या दिशेने निघाला होता. हत्तुर येथील ब्रिजवर समोरून एमएच१३इए -२९२७ या क्रमांकाचे दुचाकि धडकल्याने त्या दुचाकि वरील सुनील राजेंद्र गोसावी (वय ३२ रा. करमाळा) याच्यासह तिघेजण जखमी झाले होते. त्यांना ॲम्ब्युलन्स मधून शासकीय रुग्णालयात दाखल केले असता त्यापैकी समर्थ धरणे हा तरुण उपचारापूर्वी मयत झाला.

# ‘दक्षिण’ची मशाल विधानसभेत पाठवा

## खासदार संजय राऊत यांची कार्यकर्त्यांना हाक

**दक्षिण सोलापूर/प्रतिनिधी**

**आगामी विधानसभेची निवडणूक ही महाराष्ट्राच्या रक्षणाची आणि अस्मितेची लढाई आहे. दक्षिण सोलापूर मतदारसंघाचा उमेदवार हा तुमच्याच मनातीलच असणार आहे. मात्र, या मतदारसंघातून मशाल विधानसभेत पाठवा. हा मेळावा नसून ही अमर पाटील यांच्या विजयाची सभा आहे, असे सांगून खासदार संजय राऊत यांनी सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघामधून अमर पाटील यांची अप्रत्यक्षपणे उमेदवारीच जाहीर केली.**

दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील शिवसैनिकांचा मेळावा खासदार संजय राऊत यांच्या उपस्थितीत गुरूवारी सायंकाळी झाला. त्या मेळाव्यात बोलताना खा. राऊत यांनी दक्षिण सोलापूर मतदारसंघावर दावा केला.

राऊत म्हणाले, अमर पाटील यांचे कौतुक करावसे वाटते. निवडणुकीच्या तारखा अजून जाहीर झालेल्या नाहीत. पण तुम्ही कामाला लागला आहात. मी लढणार आणि जिंकणार, असा आत्मविश्वास पाहिजे.

सोलापूरचे प्रश्न जसेच्या तसे आहेत. अमर पाटील यांनी जिल्हा परिषदेचे सदस्य म्हणून जे काम के ते येथील आमदार-खासदाराला करता आले नाही. सोलापुरात एमआयडीसी नाही; म्हणून उद्योग नाहीत, पाण्याचा प्रश्न आहे. हे प्रश्न सोडवायचे असतील तर दक्षिण सोलापुरात शिवसेनेचा आमदार निवडून आणला पाहिजे.

ते पुढे म्हणाले, शिवसेना आणि धनुष्यबाण डोळ्यासमोर चोरांनी चोरून नेले, मोदी त्या चोरांचे सरदार आहेत. धनुष्यबाण गेला, मात्र आता हाती मशाल घेतली आहे. जेव्हा आमचा पक्ष चोरून नेला, तेव्हा संपूर्ण राज्यात अमर पाटील यांच्यासारखे निष्ठावंत उद्धव ठाकरेंसोबत उभे टाकले. त्यामुळेच नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांच्या ४०० पार ला बूच लावण्याचे काम महाराष्ट्रातून उद्धव ठाकरेंनी केले आहे. विधानसभेच्या निवडणुका पुढे ढकल्या आहेत, देशात हुकूमशाही आणण्याचा प्रयत्न आहे, असा आरोपही राऊतांनी केला. या मेळाव्याला माजी आ.रतिकांत पाटील, निरीक्षक अनिल कोकीळ, जिल्हा प्रमुख अमर पाटील, पुरुषोत्तम बरडे, गणेश वानकर, अस्मिता गायकवाड यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.




**सोलापूर : शिवसैनिकांच्या मेळाव्यात बोलताना खा.संजय राऊत. सोबत अमर पाटील.**

### पोलिस अधिकाऱ्यांनी मस्ती दाखवू नये

आमच्या शिवसैनिकांना बॅनर्स लावू दिले नाहीत. पोलिसांनी सोलापुरात दडपशाही केली, असे कळले फक्त २ महिने थांबा. एवढी मस्ती अधिकाऱ्यांनी दाखवू नये. सत्ता येते सत्ता जाते. आमच्या कार्यकर्त्यांवर खोटे गुन्हे दाखल करणारे अधिकारी आमच्या दारासमोर उभे टाकणार आहेत. प्रत्येकाची नोंद ठेवली जाईल. उद्या सत्ता आमच्या हातात येणार आहे आणि तुम्हाला आम्हालाच सॅल्यूट मारायचा आहे, हे अधिकाऱ्यांनी लक्षात ठेवा, असा इशारा त्यांनी नाव न घेता सोलापूर पोलिस आयुक्तांना इशारा दिला.

### हजारो शिवसैनिक आणि भगवा आसमंत

अमर पाटील यांच्या संपर्क कार्यालयाच्या उदघाटणाला शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. त्याचवेळी निर्मिती लॉन्स गार्डन आवारही शिवासिनीकांनी भरून गेले होते. वातावरणात एकच उत्साह होता. जणू आसमंत भगवे झाले होते.

---

### अमर पाटील यांच्या विजयाचा निर्धार

अमर पाटील यांच्या विजयाचा निर्धार उपस्थित कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. अमर पाटील येताच कोण आला रे कोण आला शिवसेनेचा वाघ आला. संजय राऊत आगे बढो अशा घोषणानी आवर दुमदमून गेले. त्याची दखल राऊत यांनी आपल्या भाषांनात घेत अप्रत्यक्षपणे अमर पाटील यांची उमेदवारीच जाहीर केली.

## अमर पाटील यांच्या मागे उभे राहण्याचे आवाहन

### ... त्यांनी स्वाभिमान मोदींकडे गहाण टाकला

राज्यात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा मोदीच्या उपस्थित राहिला आणि वाऱ्यामुळे पडला, त्या पुतळ्यातही भ्रष्टाचार झाला आहे. या लोकांना राज्य करण्याचा अधिकार नाही. छत्रपतींच्या पुतळ्यात भ्रष्टाचार करणाऱ्यांनी राज्याचा स्वाभिमान मोदींकडे गहाण टाकला. हे सरकार राहता कामा नये. त्यांनी शिवसेना तोडली, त्यामुळे त्यांना महाराष्ट्र लुटायला मिळाला आहे. गुजराती व्यापार मंडळाचे हे धोरण आहे.

---

### १५०० तुम्हारा, वोट हमारा

अचानक बहिणी सरकारच्या लाडक्या झाल्या आहेत. निवडणूक आल्या की लाडक्या बहिणीची किंमत फक्त १५०० रुपये केली आहे. १५०० रुपये घ्यायचे. ते शिंदे आणि फडणवीसच्या घराचे नाहीत. अजित पवार उपकार करत नाहीत. १५०० तुम्हारा, वोट हमारा. दोन महिन्यांनी आमचं सरकार येईल, तेव्हा १५०० चे आम्ही ३००० करू. लाडक्या बहिणीचे फायदे कसे घ्यायचे, हे आम्हाला माहिती आहे, असेही खा. राऊत म्हणाले.

---

### ...तर आम्हाला न्याय कसा मिळणार?

देशाचे सरन्यायाधीश कधीही राजकीय नेत्याला घरी बोलावत नाहीत. नरेंद्र मोदी मात्र त्यांच्या घरी गेले आणि आरती केली, तेव्हा आम्हाला खात्री पटली की पळून गेलेले ४० आमदार अपात्र का ठरवू शकत नाहीत. न्यायाधीश झुकत असतील तर आम्हाला न्याय कसा मिळणार, असा प्रश्नही खा. राऊत यांनी उपस्थित केला.

## कुत्रा आडवा आला; जखमी दुचाकी चालकाचा मृत्यू

**सोलापूर/प्रतिनिधी**

दुचाकिंवरून प्रवास करीत असताना अचानक कुत्रा समोर आल्यामुळे घसरून जखमी झालेले सुभाष दगडू गायकवाड (वय ५५ रा.तांदुळवाडी ता . दक्षिणसोलापूर) हे सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना गुरुवारी सकाळी मयत झाले. हा अपघात सोमवारी रात्री भाळवणी (ता.पंढरपूर) येथील चंद्रपूर साखर कारखान्याजवळ घडला होता. सुभाष गायकवाड हे ९ सप्टेंबर रोजी रात्रीच्या सुमारास दुचाकिंवरून भाळवणी वरून निघाले होते. चंद्रपूर कारखान्याजवळ दुचाकि समोर अचानक कुत्रा आल्याने ते घसरून खाली कोसळले होते . त्यांना जखमी अवस्थेत पंढरपूर येथे प्राथमिक उपचार करून शोभा गायकवाड (पत्नी) यांनी सोलापुरात दाखल केले होते. उपचारादरम्यान ते गुरुवारी मयत झाले. या अपघाताची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.



**सोलापूर : सोलापूरसह जिल्ह्यात गौरी-गणपतीच्या उत्सवाची गुरुवारी सांगता झाली. घरोघरी हळदी-कुंकूवाचा आणि लक्ष्मीचे दोरे घेण्याचा कार्यक्रम भक्ती भावाने पार पडला.**

## आरक्षणातील राजकारण थांबवण्याचा आ.राऊत यांचा इशारा

### ▶▶ अंधारात एक - उजेडात एक अशी भूमिका नाही चालणार

### ▶▶ बार्शीत बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू

**बार्शी/प्रतिनिधी**

मराठा समाजाच्या आरक्षणाच्या बाबतीत जे राजकारण होतंय ते थांबवा. कोणीही नौटंकी करू नका. ओबीसीतून मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत जी मागणी आहे, त्या मागणीच्या अनुषंगाने महायुती व महाविकास आघाडीतील सर्व राजकीय पक्ष व आमदारांनी भूमिका स्पष्ट करावी. त्यासाठी विशेष अधिवेशन घेण्यात यावे. अंधारात एक व उजेडात एक अशी भूमिका कोणी घेवू नये. असे आवाहन आमदार राजेंद्र राऊत यांनी केले.

ओबीसीतून मराठा समाजाला आरक्षण दयावे किंवा नाही याबाबत सर्वांना भूमिका स्पष्ट करण्यासाठी विशेष अधिवेशन बोलावण्यात यावे या मागणीत्सव अपक्ष आमदार राजेंद्र राऊत यांनी बार्शीतील शिवसृष्टी येथे गुरूवारपासून बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू केले आहे. त्यावेळी ते बोलत होते.



आमदार राऊत म्हणाले, आम्ही कोणाविरोधात चुकीचे वक्तव्य करण्यासाठी इथे बसलेलो नाहीत. आम्हाला समाजामध्ये कुठलीही फूट पाडायची नाही. या भूमिकेशी मी ठाम आहे. सर्वसामान्य गोरगरीब मराठयांना न्याय मिळावा यासाठी आमदार म्हणून मी ही भूमिका घेतलेली आहे. संसद आणि विधानसभा या कायदेमंडळात आपला प्रश्न सुटणार आहे. या मुद्यावर दुटप्पी भूमिका बाहेर घेतली जात आहे. ओबीसीतून आरक्षण मराठा समाजाला दयायचे की नाही. दयायचे असेल तर दया, नको असेल तर नाही म्हणा. ज्या मराठा बांधवांना ओबीसीतून नको असेल त्यांनीही तसे प्रतिज्ञापत्र दयावे.

ही प्रामाणिक भूमिका घेवून मी विशेष अधिवेशनाची मागणी केलेली आहे. निवडणूकीच्या आत अधिवेशन घ्या. निवडणूका झाल्यानंतर गोरगरीब मराठा समाजबांधवांची फसवणूक होणार आहे. त्यामुळे राज्यातील सर्व मराठा बांधवांना विनंती करतो की, सर्व आमदारांच्या घरोघरी जावा. सर्व आमदारांकडून विशेष अधिवेशन बोलवावे असे पत्र घ्या. त्याठिकाणी सर्व पक्षांनी आपली भूमिका स्पष्ट करावी. जसजशी निवडणूक जवळ येते तसतशी याला हवा दिली जाते. त्यामुळे दुधाचे दूध व पाण्याचे पाणी करावे.

मराठा समाजामध्ये कोणीही फूट पाडण्याचा प्रयत्न करू नये. सर्वच समाजातील बांधवांना उच्च शिक्षणासह सर्व शिक्षण संपूर्णपणे मोफत करावे अशी मागणी मी केलेली आहे. त्याला शासनाने प्रतिसाद दयावा असे आवाहनही त्यांनी यावेळी केली.

प्रारंभी आमदार राऊत यांनी छत्रपती शिवरायांना अभिवादन करून बेमुदत ठिय्या आंदोलनाची सुरूवात केली. यावेळी बार्शी शहर व तालुक्यातून अनेक मराठा समाजबांधव आंदोलनस्थळी आले होते.

विशेष अधिवेशन बोलावण्याच्या घोषणा यावेळी मराठा समाजबांधवांनी दिल्या. ओबीसीसह इतर समाजबांधवांनी यावेळी पाठिंब्याची पत्रे आमदार राऊत यांना दिली. योगेश केदार यांनीही यावेळी सविस्तर भूमिका मांडली. त्यांनी आमदार रोहित पवार यांच्यावर टीका केली.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



**बाप्पा, अपघात हा नक्की, हिट अँड रन किंवा मणक्याची वाट!**

| कल्याण |
|---|
| 680-45-348 |

| मुंबई |
|---|
| 480-23-247 |

# लालपरीला अच्छेदिन, गत महिन्यात १६ कोटींचा नफा

**मुंबई/वृत्तसंस्था**

**राज्यात ग्रामीण भागाची जीवनवाहिनी म्हणून जिची ओळख आहे, त्याला लालपरीला अच्छेदिन येण्याची चिन्हे दिसत आहेत. एसटी महामंडळाला गेल्या महियात एक दोन नव्हे तर १६ कोटींचा फायदा झाला आहे. जुलै महिन्यात हीच लालपरी तोट्यात आली होती.**



विविध सरकारी योजनांचा आधार घेत गेली अनेक वर्षे तोट्यात असलेली एसटी आता लवकरच फायद्यात येण्याची शक्यता आहे. गाव तेथे एसटी असे ब्रीद कायम ठेवताना आर्थिक अडचणींना देखील एसटी महामंडळाला सामोरे जावे लागत होते. मात्र, एसटी महामंडळ ऑगस्ट महिन्यात १६ कोटी ८६ लाख ६१ हजारांनी फायद्यात आले आहे. जुलै महिन्यात एसटी महामंडळाला १८ कोटींचा तोटा झाला होता. ऑगस्ट महिन्यात कोणतेही मोठे सणवार नसूनही एसटी महामंडळाने तोटा कमी करत १६ कोटी रुपयांचा फायदा मिळवला आहे.

दोन वर्ष कोरोना महामारी आणि त्या पाठोपाठ सहा महिने कर्मचाऱ्यांचा चाललेला दीर्घकालीन संप यामुळे एसटी महामंडळ आर्थिक दृष्ट्या डबघाईला आले होते. एसटी बंद पडते की काय ? अशी अवस्था निर्माण झाली होती. मे २०२२ पासून एसटीची सुरळीत वाहतूक सेवा सुरू झाली. तथापि, एसटीचा घटलेला प्रवासी पुनश्च एसटीकडे वळविणे हे मोठे आव्हान होते. यावेळी राज्य शासनाने ७५ वर्षावरील ज्येष्ठांना सर्व प्रकारच्या बसमधून मोफत प्रवास व सर्व महिलांना एसटीच्या प्रवासी तिकिटात ५० टक्के सवलत या दोन योजना सुरू केल्या, की ज्यामुळे एसटीच्या प्रवासी संख्येत भरघोस वाढ झाली. या आधी २०१५ साली एसटी महामंडळ फायद्यात आले होते.

अमृत ज्येष्ठ नागरिक योजनेतील घोटाळा ऑगस्ट महिन्यातच बाहेर आला होता, यावेळी अनेक वाहकांनी मान्य केले होते की, ७५ वर्ष वयाच्या नागरिकांची अतिरिक्त तिकिटे मारली जात आहेत. एसटी महामंडळाकडून देखील घोटाळा झाल्याचे मान्य करत काही बड्या अधिकाऱ्यांची बदली देखील केली होती. अशात, इतका मोठा तोटा कमी करत एसटी महामंडळ फायद्यात येत असल्याने सांगण्यात येत असलं तरी नेमकी फायद्यात येण्याची कोणती कारण आहेत.

### एसटीने अनेक अभिनव उपक्रम

याबरोबरच एसटी प्रशासनाने गेल्या वर्षभरात '' हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बस स्थानक अभियान'', विद्यार्थ्यांना शाळेत थेट पास, प्रवासी राजा दिन, कामगार पालक दिन, श्रावणात एसटी संगे तीर्थाटन, असे अनेक अभिनव उपक्रम राबविले. तसेच जे विभाग गेली कित्येक वर्ष तोट्यामध्ये आहेत, त्याा विभागांना मार्गदर्शन करण्यासाठी मध्यवर्ती कार्यालयाकडून पालक अधिकाऱ्यांची नियुक्ती केली गेली. स्थानिक पातळीवर आगारनिहाय कर्मचारी व अधिकारी यांच्या बैठका घेण्यात आल्या. तोट्याच्या मार्गावरील बस फेऱ्या बंद करून, त्या ज्या मार्गावर प्रवासी जास्त आहेत तेथे वळविण्यात आल्या.

### अजून नफा वाढवता येईल

एसटी महामंडळाच्या ग्रामीण भागात जाणाऱ्या गाड्यांचे नियोजन नसते.कधी एसटी उशीरा येते तर कधी लवकर निघून जाते. त्यामुळे प्रवाशांना सब स्थानकांवर ताटकळत उभे रहावे लागत असते.जिथे एसटी थांबते त्याच ठिकाणी खाजगी गाड्या थांबत असतात आणि प्रवाशांची वाहतूक करत असतात.महामंडळाने अशा खाजगी गाड्यांना प्रतिबंध केल्यास तसेच वेळेवर गाड्या सोडण्याची कार्यवाही केल्यास उत्पन्न अजून वाढू शकते.

CMYK